# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर  वर्ष ५ वे  अंक २९  बुधवार दि.३० जुलै २०२५  पृष्ठे ४  स्वागत मूल्य २ रू.


## नागझरीच्या नागोबा मंदिर देवस्थानचा सर्वांगीण विकास करणार - आ. कराड





लातूर :- असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या लातूर तालुक्यातील मौजे नागझरी येथील श्री नागोबा मंदिर देवस्थानास पर्यटन विकासाचा 'ब' दर्जा मिळून देणार असून या मंदिर परिसराचा सर्वांगीण विकास करण्याची माझी जबाबदारी असल्याची ग्वाही लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांनी दिली.

प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी मोठ्या उत्साहाच्या वातावरणात नागपंचमीच्या निमित्ताने लातूर तालुक्यातील मौजे नागझरी येथील असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री नागोबा देवस्थान मंदिर येथे यात्रा भरली असून बहूसंख्य भाविक भक्तांनी देवस्थान परिसरात मोठी गर्दी केली होती. यात्रेच्या निमित्ताने लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांनी श्री नागोबा मंदिरात जाऊन भक्तीभावे महापूजा करून दर्शन घेतले. यावेळी आ. कराड यांच्यासमवेत भाजपा किसान मोर्चाचे उपाध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर, ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष भागवत सोट, सतीश आंबेकर, अनिल भिसे, लातूर ग्रामीण मंडल अध्यक्ष प्रताप पाटील, विजय काळे, गोपाळ पाटील, ज्ञानेश्वर जुगल, संतोष चव्हाण, अविनाश रणदिवे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थित होती.

यावेळी मंदिर ट्रस्ट आणि नागझरी ग्रामस्थांच्या वतीने आ. रमेशअप्पा कराड यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. भाविक भक्ताच्या वर्गणीतून मंदिर परिसरात बांधण्यात येत असलेल्या भक्तनिवास बांधकामाची व इतर विकास कामाची पाहणी करून आ. कराड यांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी उपस्थितांशी संवाद साधताना या मंदिराच्या सर्वांगीण विकासाची माझी जबाबदारी असल्याचे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, या देवस्थानात येणाऱ्या भाविक भक्तांना सोयीसुविधा मिळाल्या पाहिजे यासाठी मंदिराच्या सर्वांगीण विकासाचा परिपूर्ण तातडीने प्रस्ताव द्यावा, राज्य शासनाच्या पर्यटन विकास योजनेचा 'ब' दर्जा मिळवून देवू सदरील दर्जा प्राप्त होताच तब्बल पाच कोटी रुपयांचा निधी या मंदिराच्या सर्वांगीण विकासासाठी उपलब्ध करून देणार असे सांगून नागझरी गावच्या विकास कामासाठीही निधीची कमतरता पडू देणार नाही असेही त्यांनी बोलून दाखविले.

यावेळी परमेश्वर पवार, हनुमंत पवार, बालाजी गवळी, भूषण काळदाते, नागनाथ बनसोडे, प्रदीप काळे, बापू सोट, प्रशांत शिंदे, रमेश लहाडे, अमोल लोमटे, नितीन लोंढे, प्रशांत रायमुळे, सुरेश सूर्यवंशी, पद्माकर होळकर, प्रकाश झाडगे, सतीश शिंदे, नागोबा मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष मारुती पवार, बसवंत पवार, गुरुनाथ स्वामी, आत्माराम घोडके, गोपाळ पवार, श्रीकिशन पवार, कल्याण पवार, हनुमंत घोडके, श्रीराम पवार, शेषराव पांडे, बापूराव पवार, सचिन स्वामी, विष्णू पवार, अशोक पवार, देविदास भोळे, फुलचंद हरेगावकर, नागनाथ जोगदंड, व्यंकट भोसले, दुर्गा घावीट, सचिन जोगदंड, शुभम रणदिवे, अविनाश भोळे, कृष्णा भोळे, बालाजी रणदिवे यांच्यासह ग्रामस्थ भावीक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## फुलेनगर येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त रक्तदान शिबिर संपन्न

### २१ रक्तदात्यांनी रक्तदान करून महामानवांना दिली मानवंदना

केज/प्रतिनिधी केज शहरातील महात्मा फुलेनगर, आंबेडकर नगर, हाउसिंग कॉलनी येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त विविध सांस्कृतिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले असून मंगळवार रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या शिबिरामध्ये २१ रक्तदात्यांनी रक्तदान करून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त एक अनोखी मानवंदना महामानवाला देण्यात आली आहे. या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार पक्षाचे ज्येष्ठ हारुणभाई इनामदार यांची प्रमुख उपस्थिती होती.



कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रभाग क्रमांक नऊच्या नगरसेविका सौ. पद्मिनी आक्का शिंदे, डॉ. मुलानी सर, संपादक मुबाशीर खतीब, दलित अन्याय अत्याचार निर्मूलन समितीचे अध्यक्ष रोहित कसबे, पत्रकार तात्या गवळी, लहुजी शक्ती सेनेच्या महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष प्रियंका लांडगे, मेजर लक्ष्मण थोरात, राजूबाई थोरात, वाघमारे ताई यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून वंदन करण्यात आले. यावेळी जयंती उत्सव समितीच्या वतीने उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी मनोगत व्यक्त करून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या कार्यावर प्रकाश टाकत उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले.

सदर रक्तदान शिबिर हे यशस्वी पार पाडण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयाच्या रक्तपेढीचे डॉक्टर नर्स कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेऊन रक्तदान शिबिर यशस्वी पार पाडले. या शिबिरात २१ रक्तदात्याने रक्तदान करून एक अनोखी महामानवांना मानवंदना दिल्यामुळे या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. यावेळी या भागातील युवक-युती, महिला व नागरिक यांच्यासह जयंती उत्सव समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

## सुसंस्कृत लातूरची शांतता अबाधित राखण्याचे भान राजकीय पक्षांसह सगळ्यांनी राखावे : बसवंतप्पा उबाळे

लातूर : लातूर शहरात मागच्या काही दिवसापूर्वी शासकीय विश्रामगृहावर राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षांच्या उपस्थितीत छावा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना मारहाण करण्याचा अनुचित प्रकार घडला. हा प्रकार शांत व सुसंकृत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लातूरकरीता उचित नाही. त्यामुळे आगामी काळात सुसंस्कृत लातूरची शांतता अबाधित राखण्याचे भान सर्वच प्रमुख राजकीय पक्षांच्या नेत्यांसह सगळ्यांनी राखणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ नेते बसवंतप्पा उबाळे यांनी मंगळवारी लातूरमध्ये पत्रकारांशी बोलताना केले. दि. २० जुलै २०२५ रोजी शासकीय विश्रामगृहावर घडलेल्या घटनेस जातीय रंग देण्याचा प्रयत्न कोणीही करू नये, असे आवाहनही उबाळे यांनी केले. लातूरच्या शासकीय विश्रामगृहावर दि. २० जुलै २०२५ रोजी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत घडलेल्या घटनेचे पडसाद सगळीकडे उमटले. काही मंडळींनी या प्रकारसजातीय रंग देऊन शहरात जातीय तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला. हा प्रकार अतिशय चुकीचा व असमर्थनीय असल्याचे सांगून बसवंतप्पा उबाळे म्हणाले की, विश्रामगृहावर छावाच्या पदाधिकाऱ्यांना झालेली मारहाण निंदनीय असून आपण त्याचा जाहीर निषेध करतो. त्या दिवशी विश्रामगृहावर जे घडले ते लातूरच्या परंपरेला अशोभनीय असे होते. त्या कृतीमुळे शेजारच्या बीड जिल्ह्याचे वारे आपल्या जिल्ह्यातही शिरले की काय ? अशी शंका अनेकांच्या मनात उपस्थित झाली. विरोधकांचाही सन्मान करणारा आपला जिल्हा आहे. एका निवडणुकीच्या प्रचारादरम्यान आपण लातूर तालुक्यातील बाभळगाव येथे गेलो असताना प्रचार सभेत दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांच्यावर टीका केली होती. मात्र, त्या टीकेचे कोणतेही पडसाद तेव्हा उमटले नव्हते. आजही लातूरच्या शांत व सुसंस्कृतपणाबद्दल भरभरून बोलले जाते. त्या वक्तव्याला कोणत्याही परिस्थितीत गालबोट लागणार नाही, याचे भान राखून प्रत्येकाने चालले पाहिजे. निवडणुकीच्या आधी एक रुपयांमध्ये पीकविमा काढला गेला. निवडणुका पार पडल्यानंतर शेतकऱ्यांकडून त्यासाठी पैसे आकारून केंद्र शासन विमा कंपन्यांची बाजू घेत असल्यासारखे वाटत असल्याचेही त्यांनी बोलून दाखविले. समाजव्यवस्था उध्वस्त करण्याचा प्रयत्न शासनाकडून होत असल्याचा आरोप करून त्यांनी आज विकासाच्या नावाखाली सामन्यांमध्ये भांडणे लावण्याचा प्रकार सुरु असल्याबद्दल तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली. भारतीय दलित पँथरचे प्रदेश कार्याध्यक्ष संजयभाऊ कांबळे यांनी यावेळी बोलताना लातूरच्या शासकीय विश्रामगृहावर घडलेली घटना निषेधार्ह असून भविष्यात अशा प्रकारच्या घटना घडू नयेत म्हणून शासनानेही सर्वतोपरी प्रयत्न करावेत असे आवाहन केले. आपण सारे आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते - पदाधिकारी आहोत. प्रत्येकजण विविध पक्ष - संघटनेशी संबंधित आहेत. कोणत्याही राजकीय पक्ष संघटनेशी संबंधित असलो तरी आंबेडकरी चळवळ म्हणून आम्ही सर्वजण प्रसंगी एकत्रित येऊन सामूहिक लढा देण्यास सज्ञ असतो,असेही कांबळे यांनी सांगितले. कोणत्याही चुकीच्या बाबींचे समर्थन कोणीही करता कामा नये. मात्र,असे करत असताना कोणावर जाणीवपूर्णक अन्यायही होणार नाही, याची दक्षता बाळगणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सामान्यांचे अभिव्यक्ती स्वातंत्र्यच आज धोक्यात आल्याचेही त्यांनी बोलून दाखवले. याप्रसंगी भीम आर्मीचे अक्षय धावारे , व्हिएस पँथरचे शरद किनीकर , धम्मानंद घोडके यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.




## २०२५ चा लोकशाहीर झुंजार पत्रकार पुरस्कार पत्रकार तात्या गवळी यांना जाहीर

केज/प्रतिनिधी २०२५ चा लोकशाहीर झुंजार पत्रकार पुरस्कार पत्रकार तात्या गवळी यांना नुकताच जाहीर झाला असून दिनांक १ ऑगस्ट रोजी २०२५ लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त मान्यवरांच्या हस्ते पुरस्काराने गौरवण्यात येणार आहे. याबाबतचे सविस्तर वृत्त असे की, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त कै. प्रमोद लांडगे युवा मंच यांच्या वतीने दलित चळवळीतील लढाऊ कार्यकर्त्यांना व दलित चळवळीला आपल्या दमदार व धारदार लेखणीच्या माध्यमातून न्याय देणाऱ्या पत्रकारितेतील नामांकित पत्रकार यांना लोकशाहीर झुंजार पत्रकार पुरस्कार प्रत्येक वर्षी देण्यात येत असल्याने यावर्षीचा कै. प्रमोद लांडगे युवा मंच यांच्यावतीने देण्यात येणारा २०२५ चा लोकशाहीर झुंजार पत्रकार पुरस्कार हा पत्रकार तात्या लहू गवळी यांना नुकताच जाहीर करण्यात आला असून दिनांक १ ऑगस्ट २०२५ रोजी सिद्धार्थ नगर,केज येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त भव्य कार्यक्रमांमध्ये पत्रकार तात्या गवळी यांना लोकशाहीर झुंजार पत्रकार पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. असे २०२५ च्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष प्रेम लांडगे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे माहिती दिली आहे. या निवडीबद्दल पत्रकार तात्या गवळी यांच्यावर सर्व स्तरातून शुभेच्छा चा वर्षाव होत आहे.



## स्वछता सफाई कामगारांचा गुरुवारी लातुरात होणार सत्कार सन्मान सोहळा

लातूर :- सफाई कामगार बलिदान दिवस म्हणून ३१ जुलै १९७८ पासून देशभर साजरा केला जातो. त्याचाच एक भाग म्हणून लातूर येथे अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेच्या वतीने हा दिवस साजरा केला करण्यात येणार आहे. त्यानिमित्त गुरुवारी ३१ जुलै रोजी लातूर शहरातील गांधी मार्केट येथील भालचंद्र ब्लड बँकेच्या सभागृहात सायंकाळी ४ वाजता लातूर मनपाच्या स्वछता सफाई कामगारांचा सत्कार सोहळा आयोजित केला असून सहाय्यक कामगार आयुक्त मंगेश झोले हे उपस्थित राहून कामगारांना मार्गदर्शन करणार आहेत. अशी माहिती कामगार नेते तथा अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजकुमार होळीकर यांनी दिली आहे. सफाई कामगारांचे स्वछता व सफाई मधील योगदान लक्षात घेवून कामगार बलिदान दिवस लातूरमध्ये गेल्या चार पाच वर्षांपासून साजरा केला जातो. या दिवशी स्वछता व सफाई काम करणाऱ्या कामगारांच्या दैनंदिन कामातील अडचणी, त्यांच्या प्रश्नांची चर्चा करून ते सोडवण्याचे नियोजन केले जाते. तसेच सफाई कामगारांसाठी असलेल्या योजना व कायदे याची कामगारांना माहिती दिली जाते. लातूर मनपा अंतर्गत स्वछता व सफाईचे काम करणाऱ्या निर्व्यसनी राहून आपले काम चोखपणे निभावणाऱ्या तसेच आपल्या पाल्याना शिक्षण व उच्च शिक्षण देणाऱ्या कामगारांना आदर्श गुणवंत कामगार म्हणून १३ कामगारांचा सत्कार सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास लातूर शहरातील स्वछता सफाई कामगारांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संघटनेचे सचिव शिवाजी भंडारे, उपाध्यक्ष सुरेश काटे, लातूर शहराध्यक्ष अंकुश टकळगे, तालुकाध्यक्ष चंद्रपाल गिरी, मंगलताई शिंदे, नूतन अंगरखे, घंटागाडी सफाई कामगार विभाग अध्यक्ष विशाल काळे, सचिव महेंद्र कांबळे, ज्योती उपाडे, लहू जगताप, परमेश्वर कांबळे, सुधीर कांबळे, आयुब शेख, ईश्वर काळे, सुनील सगट, अंजना सगट, अभिजित बनसोडे, कुमार कांबळे, अमोल शिंदे, रोहित कांबळे, अन्तेश्वर सगट, अंगद बनसोडे, सूर्यकुमार गायकवाड, सचिन काळे, किशोर सगट, शिलाताई भोळे, रेणुकाताई कांबळे, बंडू कांबळे, लक्ष्मी सोनवणे, रेखाताई शिंदे, रुक्मिणी कांबळे आदींनी केले आहे.

## विद्यार्थ्यांसाठी दिलासादायक निर्णय!

### पांढरकवडा-पाटण बस सेवा पुन्हा सुरू होणार-आगार व्यवस्थापकांची ग्वाही

यवतमाळ/ प्रतिनिधी :- झरीजामणी:पांढरकवडा-पाटण ही बस सेवा आधी सुरु होती. परंतु मध्यंतरी ती बंद करण्यात आली. या मार्गावरील विद्यार्थ्यांसाठी अत्यंत आवश्यक असलेली बस सेवा लवकरच पुन्हा सुरु करणार आहोत. हे केवळ आश्वासन नाही तर ग्वाहीच आहे, असे स्पष्ट शब्दात आपले मत मांडत पांढरकवडा आगार व्यवस्थापक मा. आशिष काकडे यांनी विद्यार्थ्यांना दिलासा दिला आहे. पूर्वी ही बस सेवा सुरु होती, मात्र काही कारणांमुळे ती बंद करण्यात आली. त्यामुळे या मार्गावरील दिग्रस, सुर्दापूर, कमळवेल्ली, सतपल्ली, अहेरअल्ली, दाभा, टाकळी, बोरी, कोपामांडवी, सुन्ना, ढोकी, मराठवाकडी या गावातील विद्यार्थ्यांना पांढरकवड्यास अध्यापनासाठी ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. या समस्येची गंभीर दखल घेत स्थानिक तरुणांनी एकत्र येऊन आगार व्यवस्थापकांची भेट घेऊन निवेदन दिले आणि सविस्तर चर्चा केली. विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी ही सेवा अत्यावश्यक असल्याचे निदर्शनास आणून दिल्यानंतर काकडे साहेबांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. त्याचबरोबर झरी ते यवतमाळ ही बस सेवा देखील लवकरच सुरु करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली आहे. या दोन्ही सेवा सुरु झाल्यास शैक्षणिक, सामाजिक व दैनंदिन व्यवहारांसाठी ग्रामीण भागातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. स्थानिक नागरिक व विद्यार्थी वर्गांकडून या निर्णयाचे स्वागत होत असून आगार व्यवस्थापक आशिष काकडे यांचे आभार व्यक्त केले जात आहेत. यावेळी प्रशांत निमसरकर, अनिलभाऊ मोहजे, दत्ताभाऊ परचाके, सुरज गड्डमवार, वेदांत बनपेल्लीवार, अनिलभाऊ देवतळे, बापुराव टेकाम आदी स्थानिक युवा उपस्थित होते.



# संपादकीय

## गाझात भुकेचा आगडोंब

इस्रायलच्या आक्रमणामुळे गेल्या एप्रिलपासूनच गाझा पट्टीतील लोकांची उपासमार सुरू झाली. तेथील बॉम्बवर्षाव सुरूच असून, दिवसागणिक बळींची आणि जखमी नागरिकांची संख्या वाढतच आहे. जवळजवळ सर्व पायाभूत सुविधा उद्ध्वस्त झाल्या आहेत. शिवाय भीषण अन्नदुर्भिक्ष भासण्याची शक्यता संयुक्त राष्ट्रांनी पूर्वीच वर्तवली होती. गाझामधील युद्ध आता संपले पहिजे आणि इस्रायलने आंतरराष्ट्रीय कायद्यांचे पालन केले पाहिजे, असे सुचवत ब्रिटन, फ्रान्स आणि अनेक युरोपीय राष्ट्रांसह २५ देशांनी गेल्याच आठवड्यात संयुक्त निवेदनही प्रसिद्ध केले. स्वाक्षरी करणार्यांमध्ये २० युरोपीय देशांचे परराष्ट्रमंत्री तसेच कॅनडा, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, जपान आदी देशांच्या प्रतिनिधींचा समावेश आहे. मात्र अमेरिका व जर्मनीने या निवेदनावर सही केलेली नाही. गाझातील जनतेचे दुःख चरमसीमेवर पोहोचले असून, त्यांच्या अन्नपाण्याच्या मूलभूत गरजाही पुर्या होत नाहीत. लहान मुलांसह नागरिकांची एकप्रकारे हत्याच केली जात असल्याचेही निवेदनात म्हटले आहे. पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्या नेतृत्वाखालील इस्रायलचे वर्तन आजवर हटवादी राहिलेले असून, निरपराध नागरिकांची ते पर्वा करत नाहीत.

आंतरराष्ट्रीय कायदे व मानवी हक्क चिरडून टाकणार्या नेतान्याहू यांच्या विरोधात इस्रायलमध्येही निदर्शने होत असतात. गाझा पट्टीतील अनेक इस्पितळांमधील परिचारिकाही अन्नपाण्यावाचून मोठ्या संख्येने बेशुद्ध पडत आहेत. नवजात अर्भकांना केवळ पाण्यावरच जगवावे लागत आहे. याच महिन्यात उपासमारीमुळे ५६ पॅलेस्टिनींचा मृत्यू झाला. गाझामधील एकतृतीयांश जनता कैक दिवस उपाशी आहे, असे 'वर्ल्ड फूड प्रोग्रॅम'ने म्हटले आहे. जगभर अनेक देशांत इस्रायलच्या विरोधात मोर्चे निघत असून, 'पॅलेस्टिनींचे जीव वाचवा', अशी हाक दिली जात आहे. आता संकटग्रस्त जनतेला मदत देता यावी म्हणून इस्रायलने गाझा पट्टीतील लष्करी कारवाया रोज १० तासांसाठी थांबवण्याची घोषणा केली आहे. इजिप्त, जॉर्डन आणि संयुक्त अरब अमिरातींनी हवाई छत्र्यांद्वारे संकटग्रस्तांना मदत पुरवण्याचे काम सुरू केले आहे.

इस्रायल आणि हमास यांच्यातील दोहा येथील वाटाघाटी असफल ठरल्या आहेत. त्यात अमेरिकेचाही सहभाग होता. हमासचा एकूणच पवित्रा प्रामाणिकतेचा नाही, अशी अमेरिका व इस्रायलची भावना आहे. मात्र फ्रान्सने सप्टेंबरमध्ये पॅलेस्टाईन स्टेटला मान्यता देऊ, अशी घोषणा केली असून, अमेरिका व इस्रायलला हे रुचलेले नाही. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इस्रायलच्या इराणवरील हल्ल्यास पाठिंबा दिला होता. अमेरिकेनेही इराणच्या आण्विक केंद्रांवर हल्ले घडवले होते. फ्रान्सचे अध्यक्ष मॅक्रॉन, ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर, कॅनडाचे पंतप्रधान मार्क कॅरनी आणि ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांनी इस्रायलच्या गाझातील कारवाईस विरोध केला आहे. शस्त्रसंधीच्या वाटाघाटींमधून अमेरिकेने अंग काढून घेतल्यानंतर हमासचा सर्वनाश करण्यास मोकळीक मिळाली आहे, असे इस्रायलला वाटते.

गाझा पट्टी कायमस्वरूपी ताब्यात घेण्याचा इस्रायलचा डाव आहे. पॅलेस्टिनींनी गाझामधून निघून जावे, असे आवाहन इस्रायलचे मंत्री इटामार बेन-ग्वीर यांनी केले आहे. गाझामधील सहा लाख पॅलेस्टिनींना राफामध्ये हलवण्याची इस्रायलची योजना आहे. गाझाची लोकसंख्या २१ लाख असून, भविष्यकाळात तो 'कॉन्सन्ट्रेशन कॅम्प' बनू शकेल, अशी शक्यता इस्रायलचे माजी पंतप्रधान एहुद ओलमर्ट यांनी व्यक्त केली आहे. 'इस्रायल-अमेरिकन गाझा ह्युमॅनेटेरियन फौंडेशन'मार्फत पॅलेस्टिनींना मदत दिली जात असताना मदत केंद्रांच्या बाहेर भुकेने तडफडत असलेल्या एक हजार पॅलेस्टिनींना ठार मारल्याची धक्कादायक माहिती संयुक्त राष्ट्रांच्या अहवालात दिली आहे.

# निस्वार्थतेचे तेज

इतरांसाठी दिवा पेटवलात तर त्या दिव्याच्या उजेडात तुमच्यावरही प्रकाश पडतो आणि तुमचं आयुष्यही तेजस्वी होतं, म्हणून इतरांची निस्वार्थपणे मदत केली पाहिजे, कारण आपण केलेली कुठलीही चांगली कृती व्यर्थ जात नाही, तिचं फळ कुठे ना कुठे नक्की मिळतं; इतरांच्या जीवनात आनंद, आधार आणि आशा निर्माण करणं हेच माणूस म्हणून आपलं खरे योगदान असून, अशा निःस्वार्थ कार्यातून मिळणाऱ्या समाधानाचं मोल कोणत्याही वैभवापेक्षा मोठं असतं. माणूस हा समाजात राहणारा प्राणी आहे आणि त्याचे अस्तित्व इतरांशी जोडलेलं असतं; एकटं कुणीही यशस्वी होत नाही, कारण आपल्याला आयुष्यात प्रत्येक टप्प्यावर इतरांची मदत लागते, ती कधी आई-वडिलांची असते, कधी शिक्षकांची, कधी मित्रांची, तर कधी अनोळखी व्यक्तींचीही. म्हणूनच जीवन जगताना आपण आपल्याच फायद्याचा विचार न करता, इतरांच्या कल्याणासाठी, त्यांच्या मदतीसाठी काहीतरी केलं पाहिजे. प्रत्येकाने आपल्या परीने दुसऱ्याला दिलेला एक क्षण, एक हात, एक शब्द, किंवा एक स्मितहास्य हे अनेकदा त्या व्यक्तीच्या अंधारातून बाहेर येण्याचं कारण ठरतं. निस्वार्थतेने केलेली कृती म्हणजे एखाद्या अंधाऱ्या खोलीत न फुकटचा प्रकाश टाकण्यासारखी असते, ज्याने समोरच्याला दिशा सापडते आणि तो त्याच्या मार्गावर विश्वासाने चालू शकतो. ही निस्वार्थ भावना फक्त मोठ्या गोष्टींमध्ये असते असं नाही, तर ती रोजच्या छोट्या कृतींमध्येही दिसते, जसं एखाद्या गरीब माणसाला जेवण देणं, रस्त्यावर पडलेल्या प्राण्याला पाणी देणं, एखाद्या वृद्धाला रस्ता ओलांडताना मदत करणं, एखाद्या विद्यार्थ्याला मार्गदर्शन करणं, निराश झालेल्या मित्राला धीर देणं, किंवा कुणाच्या चेहऱ्यावर हास्य फुलवणं, ही सगळी छोटी वाटणारी कामं खूप मोठी परिणाम साधणारी ठरतात. इतरांसाठी काही न सांगता, न मागता करणे हे खरे समाजधर्माचे पालन आहे, कारण आपण जे पेरतो, तेच उगवतं, आणि आपलं कर्म आपल्याकडे परत येतंच. म्हणूनच दुसऱ्यांसाठी दिवा पेटवा हा विचार केवळ एक प्रेरणादायक घोषवाक्य नसून, ते जगण्याचं तत्वज्ञान आहे. आजच्या स्पर्धात्मक आणि स्वार्थी जगात जिथे प्रत्येकजण केवळ स्वतःच्या यशासाठी धडपडतो आहे, तिथे जर आपण 'दुसऱ्याचंही काही भलं होईल का?' हा विचार मनात ठेवला, तर समाजात एक वेगळा उजेड निर्माण होईल. आपण एखाद्याला मदतीचा हात दिला की, ते फक्त त्याचं जीवन बदलत नाही, तर ते अनुभवाने समृद्ध झालेलं आपलंही जीवन उजळतं. म्हणूनच, मदत ही कुणावर उपकार करण्यासाठी नसते, ती सह-अस्तित्वाच्या भावनेतून, आपणही त्या व्यक्तीचा एक भाग आहोत या जाणिवेतून येते. प्रत्येक व्यक्तीकडे काही ना काही असतं जे तो इतरांना देऊ शकतो, कुणाकडे पैसा, कुणाकडे वेळ, कुणाकडे ज्ञान, कुणाकडे अनुभव, तर कुणाकडे फक्त सहवास, पण ह्या सर्व गोष्टींचा उपयोग जर आपण इतरांच्या भल्यासाठी केला, तर ते आपल्यासाठीही समाधानकारक ठरतं. ज्ञानाच्या वाटेवर चालताना आपण जर मागे येणाऱ्याला हात दिला, तर आपणही अधिक स्थिरपणे चालतो, कारण दुसऱ्याच्या समृद्धीमध्ये आपलीही वाढ सामावलेली असते. आपण जेव्हा इतरांच्या चेहऱ्यावर हास्य आणतो, तेव्हा त्या हास्याच्या प्रतिबिंबात आपलंच मन प्रसन्न होतं. म्हणून, इतरांसाठी दिवा पेटवा म्हणजेच स्वतःसाठी प्रकाश निर्माण करणं, असं म्हणायला काहीच हरकत नाही. स्वामी विवेकानंद यांनी सांगितलं होतं की, जेव्हा तुम्ही स्वतःसाठी जगणं थांबवता आणि दुसऱ्यांसाठी जगायला लागता, तेव्हाच तुमचं खरं जीवन सुरू होतं. हे विचार फक्त तत्त्वज्ञानात न राहता ते प्रत्यक्ष कृतीत उतरले पाहिजे. आपल्याकडे असे अनेक आदर्श उदाहरणं आहेत, महात्मा गांधींनी त्यांच्या सत्याग्रहाच्या माध्यमातून इतरांसाठी खूप मोठा दिवा पेटवला, बाबासाहेब आंबेडकरांनी दलित समाजासाठी शिक्षणाचा दीप लावला, मदर तेरेसांनी गरीब, आजारी आणि अनाथांसाठी आपलं संपूर्ण जीवन अर्पण केलं, ही सगळी माणसं आजही आपल्या मनात जिवंत आहेत, कारण त्यांनी स्वतःच्या स्वार्थापेक्षा इतरांच्या गरजा मोठ्या मानल्या. अशाच पद्धतीने आपण आपल्या दैनंदिन जीवनात जरी लहान स्तरावर काही चांगलं केलं, तरी ते फार मोठं ठरू शकतं. उदाहरणार्थ, एखाद्या गरीब मुलाला शिक्षणासाठी वह्या-पुस्तकं देणं, एखाद्या शेतकऱ्याला कर्जमुक्त होण्यासाठी माहिती देणं, एखाद्या विधवा महिलेला स्वयंपाक शिकवून रोजगार मिळवून देणं, ही कामं समाजाला दिशा देणारी ठरतात. अनेक वेळा आपण हे सगळं 'माझ्याकडून काय होणार?' या विचाराने टाळतो, पण लक्षात ठेवा, मोठे बदल लहान पावलं उचलूनच होतात. एखादा दिवा लावल्याने जर संपूर्ण घर उजळू शकतं, तर एक माणूस जर ठरवलं, तर तो शंभर माणसांना बदलू शकतो. या कार्यात प्रसिद्धी, अपेक्षा, किंवा परतावा याचा विचार नसतो, असतो तो केवळ आत्मिक समाधानाचा, आणि हीच भावना आपल्याला खरं माणूस बनवते. समाजात कितीही अंधार असला, तरी एक दिवा पुरेसा असतो तो अंधार तोडायला; आणि जर अशा अनेक दिव्यांची रांग लागली, तर समाजाचा चेहराही उजळून निघतो. म्हणूनच, आपल्या आयुष्यात आपण कुणासाठी दिवा लावतोय, कुणाला आधार देतोय, कुणाला वाट दाखवतोय हे सतत तपासणं आवश्यक आहे. जर आपण हे करत आहोत, तर आपण खरंच जीवन समृद्ध करत आहोत. दुसऱ्यांच्या दुःखावर फुंकर घालणं, त्याच्या हाती हात देणं, अश्रूंना पुसणं, ही सारी कर्मं एखाद्या पूण्यासारखी आपल्या आयुष्यात फळं फेकतात. आपल्या कृतींमधून जर इतरांना दिलासा मिळत असेल, तर त्याचा प्रकाश आपल्यावरही येतोच, हीच जगण्याची खरी जाणीव आहे. कित्येक वेळा आपण पाहतो की समाजात अशा व्यक्ती असतात ज्या स्वतः अत्यंत साध्या जीवनात राहून इतरांसाठी मोठं योगदान देतात, एखादा शिक्षक गावात राहून दिवसरात्र विद्यार्थ्यांना शिकवतो, एखादी वृद्ध स्त्री आपल्या पेन्शनमधून अनाथ मुलांना अन्न देते, एखादा तरुण स्वतःच्या कामानंतर वेळ काढून झाडं लावतो, ग्रंथालय चालवतो, या सगळ्यांचा उद्देश कोणतीही प्रसिद्धी मिळवणं नसतो, तर समाजात चांगुलपणाचा दिवा जपणं असतो. या दिव्यांमधूनच माणुसकीचं खरं तेज प्रकट होतं. अशा निस्वार्थ कार्यातून निर्माण होणारी सकारात्मक ऊर्जा आपल्या सभोवतालच्या वातावरणात सुद्धा जाणवते. आपलं जीवन फक्त स्वतःपुरतं मर्यादित न ठेवता, इतरांच्या जीवनात आपण एखादी जाणीव, एक उमेद किंवा एक आधार ठेवू शकलो, तर तेच आपलं यश मानावं. शेवटी आपण कोण आहोत हे आपल्याला न मिळालेल्या गोष्टींनी नव्हे, तर इतरांना काय दिलं या गोष्टींनी ठरतं. प्रत्येकजण महान कार्य करू शकत नाही, पण प्रत्येकजण महानतेने छोटं कार्य नक्कीच करू शकतो. म्हणूनच दुसऱ्याच्या आयुष्यात आपण जर दिवा लावला, तर त्या प्रकाशात आपलंही मन उजळून निघतं, आणि तीच आपली खरी ओळख ठरते.

**************

प्राचार्य डॉ बालाजी रंगनाथराव लाहोरकर

# ग्रोकचा नवा वाद

सध्या ग्रोक पुन्हा एकदा चर्चेत आहे. यामागचे कारण म्हणजे ग्रोकने एकेकाळी हुकुमशहा असलेल्या हिटलरचे कौतुक केले. शिवाय स्वतःला मॅचहिटलरही म्हटले आहे. यावरून सर्वत्र चर्चा सुरू आहे.


तुम्ही एखाद्या आर्टिफ्शियल मॉडेलकडून राजकीय मुद्द्यावर ठोस किंवा ठाम भूमिकेची अपेक्षा ठेवू शकत नाही. कारण त्याचे प्राथमिक काम माहिती गोळा करणे, माहितीची योग्य रितीने हाताळणी करणे आणि ती सर्वांपर्यंत पोचवण्याचे असते. तुम्ही एखाद्या एआय मॉडेलला एखादा वादग्रस्त प्रश्न विचारला तर त्याचे उत्तर हेच असेल की, यासंदर्भात माझे कोणतेही वैयक्तिक मत नसून त्यांसंबंधी घडलेल्या गोष्टींची माहिती देऊ शकतो. मात्र काही एआय मॉडेल्स प्रामुख्याने इलॉन मस्क यांच्या ग्रोकबाबत असे म्हणता येणार नाही. कारण अलीकडेच त्याने वादग्रस्त आणि ज्वलंत राजकीय मुद्द्यात हात घालत स्वत:चे हात पोळून घेतले आहेत.

सध्या ग्रोक पुन्हा चर्चेत आहे. यामागचे कारणही तसेच आहे. जगभराने द्वेष केलेल्या हुकुमशहा हिटलरचे ग्रोकने कौतुक केल्याने सर्वत्र चर्चा सुरू आहे. ग्रोकने मांडलेल्या विचाराचा मतितार्थ काढल्यास त्याने हिटलरला प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व मानले आणि ज्यूसंदर्भात अवमानकारक मते मांडली. त्याच्या मते, ज्यू हे श्वेतवर्णियांच्या विरोधात चुकीचा नॅरेटिव्ह पसरवत आहेत.

गोल्डस्टिन, रोजेनबर्ग, सिल्वरमॅन, कोहेन आणि शपिरो यासारख्या टोपणनावाचा वापर हा नेहमीच बोलबच्चन (ज्यू) कट्टरपंथीयासाठी केला जातो आणि ते दुसर्याला अडचणीत आल्याचे पाहून आनंदी होतात, असे ग्रोकने नमूद केले. ही मंडळी माध्यम, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात दबदबा निर्माण करत असली तरी अमेरिकी लोकसंख्येत त्यांचे प्रमाण केवळ दोन टक्केच आहे.

ग्रोकने स्वत:ला 'मॅचहिटलर' नावाने ओळख करून दिली. म्हणजेच हिटरलरचा स्तुतीपाठक. मे महिन्यात देखील त्याने असाच कारनामा केल्याचे कदाचित आठवत असेल. ग्रोक जे काही करतोय ते 'हॅलुसिनेशन' नाही. जेव्हा एआय मॉडेल एखाद्या प्रश्नांचे उत्तर देण्याच्या स्थितीत नसेल तर तो उलटे-सुलटे उत्तर देऊ लागतो. परंतु सध्या ग्रोक बाल्यावस्थेत असल्याने अशा प्रकारची उत्तरे मिळताना दिसतात.

इलॉन मस्क यांनी अनेकदा आपले एआय मॉडेल व्होक (कोणतीही भूमिका न घेणारा किंवा ठोस उत्तर न देणारा) नसल्याचे म्हटले आहे. तो तटस्थ किंवा हातचे राखून उत्तर देणार्या भूमिकेपासून मुक्त आहे. त्याला स्वत:चे म्हणणे गंमतीशीर पद्धतीत मांडण्यासाठी तयार केले आहे. अर्थात, ग्रोकची आतापर्यंतची उत्तरे पाहिली तर सत्याचा शोध घेणारे मॉडेल म्हणून मस्क यांचा दावा एआयनेच खोडून काढला आहे. ग्रोकचे मत काहीवेळा पूर्वग्रहदूषित असून कधी कधी टोमणे मारणारे देखील आहे.




अँटी व्होक असणे, गंमतीशीर पद्धतीने उत्तर देणे आणि कथित सत्याचा शोध घेणे ही ग्रोकची खासियत असू शकते, मात्र त्याचा कमकुवतपणा देखील असू शकतो. जेव्हा मर्यादा ओलांडतो तेव्हा तो भरकटू लागतो. जगभरातील सर्व एआय मॉडेल हे स्वत:ला वेगळे, वैशिष्ट्यपूर्ण आणि बिनधास्त तसेच विनोदी स्वभावाचे होण्यासाठी धडपडत असताना ग्रोक मॉडेल मात्र अति विश्वास आणि स्वत:लाच श्रेष्ठ समजण्याच्या दिशेने झुकत आहे. दुसर्याला पडताळून पाहत असताना मनाप्रमाणे बोलण्याच्या स्वातंत्र्याचा उपभोग घेत आहे.

अलीकडेच मस्क यांनी ग्रोकला सर्वसमावेशक रूप देण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे म्हटले आहे. कारण तो माध्यमांचीच भाषा बोलत आहे. याचा अर्थ ग्रोकला बिनधास्त बोलणे हवे आहे. मस्क मात्र विसरतात की, पारंपरिक माध्यमे जबाबदार आणि विवेकपूर्ण कक्षेत राहून काम करत असतात आणि त्याला अनेक दशकांचा इतिहास लाभला आहे. शिवाय अनुभव, वैयक्तिक शिस्त आणि नियामकच्या आधारे तयार झाला आहे. एआयकडे अशा प्रकारची कोणतीही इनबिल्ट क्षमता विकसित नाही. दुसरीकडे ग्रोकमध्ये असणारे सुरक्षा फ्लिल्टर देखील निरुपयोगी ठरत आहेत.

वास्तविक हे फ्लिल्टर एआय मॉडेलची भाषा, तथ्य, पूर्वग्रह, भेदभाव दृष्टिकोन यास नियंत्रित करण्यासाठी वापरले जातात. आता मॉडेलची नवीन आवृत्ती ग्रोक-४ आली आहे. पण त्याने मागील मॉडेलप्रमाणे चुका करू नये, अशी अपेक्षा आहे. उदाहरणार्थ, एआयला प्रशिक्षण देताना त्याच्या डेटा क्वालिटीत सुधारणा करणारे, वैविध्यपणा मजबूत करणारे, हानीकारक मजकूर व्हायरल करण्यास प्रतिबंध करणारे यासारख्या मजबूत सुरक्षा फ्लिल्टर्सचा वापर करणे आवायक आहे.

एआयच्या माध्यमातून बाहेर पडणार्या तथ्यांचा आणि मजकुराचा आढावा घेणे तसेच समीक्षा करीत सुधारणांची प्रक्रिया सतत सुरू ठेवणे देखील तितकेच आवश्यक आहे. 'ॲडव्हसेरियल' चाचणी म्हणजे एआय मॉडेलमध्ये चुकीचे मुद्दे मांडत परीक्षा घेणे. मॉडेल्सला आणखी जबाबदार आणि सक्षम होण्यास प्रेरित करण्यासाठी सरकार आणि आंतरराष्ट्रीय संघटनेने देखील पावले उचलण्याची गरज आहे.


# मानसिक आरोग्य?

देशातील विविध शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थ्यांच्या वाढत चाललेल्या आत्महत्यांची सर्वोच्च न्यायालयाने गेल्या आठवड्यात गंभीर दखल घेतली. अशा घटनांना पायबंद घालण्यासाठी काही देशव्यापी मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. सर्वोच्च न्यायालयाने सर्व शैक्षणिक संस्थांना विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य जाणीवपूर्वक जपण्याचे निर्देशही दिले आहेत. गेल्या काही महिन्यांच्या कालावधीमध्ये देशाच्या कानाकोपर्यामध्ये विविध शिक्षण संस्था असोत किंवा खासगी शिकवणी केंद्र असो, त्या ठिकाणी विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाचे हे निर्देश अतिशय महत्त्वाचे मानावे लागतील. केंद्र सरकारच्या राष्ट्रीय आत्महत्या प्रतिबंधक धोरणाप्रमाणे 'मनोदर्पण' हा उपक्रम काही कालावधीपूर्वी सुरू करण्यात आला होता.

या उपक्रमाअंतर्गत उम्मीद या नावाने काही मार्गदर्शक तत्त्वेही तयार करण्यात आली होती. त्याच आधारे सर्वोच्च न्यायालयाने आपला हा निर्देश दिला असून सरकारने आपल्या धोरणाचा दरवर्षी फेरआढावा घेऊन त्यामध्ये परिस्थितीप्रमाणे योग्य बदल करावा असेही सुचवले आहे. सरकारतर्फे विविध शिक्षण संस्था किंवा खासगी शिक्षण केंद्रे यांच्यासाठी जोपर्यंत एखादे अशा प्रकारचे धोरण तयार होत नाही तोपर्यंत न्यायालयाने आपली स्वतःची अशी मार्गदर्शक तत्त्वेही जाहीर केली आहेत. आधुनिक काळामध्ये विद्यार्थ्यांमध्येच केवळ स्पर्धात्मकता आहे असे नाही, तर शिक्षण संस्थांमध्ये आणि खासगी शिकवणी संस्थांमध्येसुद्धा स्पर्धात्मक वातावरण आहे.

शिक्षण हा एक वेगळ्या प्रकारचा व्यवसाय झाला असल्यामुळे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना आपल्याकडे केंद्रित करण्यासाठी शैक्षणिक संस्था किंवा खासगी शिक्षण केंद्रे मोठ मोठी आश्वासने देऊन आणि भली मोठी फी आकारून विद्यार्थ्यांना ॲडमिशन देतात. पण जेव्हा ती आश्वासने पूर्ण होत नाहीत किंवा आपण अपेक्षा पूर्ण करू शकत नाही असे विद्यार्थ्यांच्या लक्षात येते तेव्हा अनेक वेळा विद्यार्थी आत्महत्येचा मार्ग पत्करतात. राजस्थानमधील शिक्षण प्रणालीचा एकेकाळी जरी मोठ्या प्रमाणात बोलबाला झाला असला, तरी गेल्या काही वर्षांपासून तेथे मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांच्या आत्महत्या झाल्याने या वेगळ्या शैक्षणिक पॅटर्नबाबतही शंका निर्माण होत आहे.

सर्वोच्च न्यायालयाने जी आपली मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली आहेत ती सर्वसाधारणपणे प्रतिबंधात्मक आहेत. म्हणजे विद्यार्थ्यांचे मानसिक समुपदेशन करत असतानाच त्यांना सहजासहजी आत्महत्या करता येऊ नये, असे काही उपाय सर्वोच्च न्यायालयाने आपल्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये सुचवले आहेत. महत्त्वाची गोष्ट म्हणजे शिक्षण घेण्याच्या वयामध्ये विद्यार्थ्यांमध्ये डिप्रेशन वाढण्याचा धोका जास्त असतो. हे डिप्रेशन केवळ अपयशामुळे येते असे नाही तर ते तुलनेमुळेसुद्धा येते. जेव्हा एक कोणत्या शिक्षण संस्थेमध्ये किंवा शिक्षण केंद्रांमध्ये गुणवत्तेच्या आधारे विद्यार्थ्यांची विभागणी केली जाते किंवा वेगळ्या तुकड्या पाडल्या जातात तेव्हा कमी गुणवत्तेच्या विद्यार्थ्यांमध्ये एक प्रकारचा न्यूनगंड तयार होतो. त्यातूनच डिप्रेशन वाढीला लागते, असेही सर्वोच्च न्यायालयाने सूचित केले आहे.




त्यामुळे गुणवत्तेच्या आधारे शैक्षणिक संस्थामध्ये तुकड्यांचे नियोजन केले जाऊ नये हा एक महत्त्वाचा विषय या निमित्ताने अधोरेखित होत आहे. शिक्षणातील यश असो किंवा नंतर नोकरीतील यश असो प्रत्येकालाच त्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागते. साहजिकच कोणाचेही वैयक्तिक मूल्यमापन त्याच्या यश किंवा अपयशावर न करता त्याने प्रामाणिकपणे घेतलेल्या परिश्रमावर करायला हवे हेच सर्वात महत्त्वाचे आहे. पालक जेव्हा लाखो रुपये फी भरून आपल्या पाल्याला एखाद्या संस्थेमध्ये ॲडमिशन घेतात तेव्हाच त्याच्या मनामध्ये चांगले यश मिळवण्याचा दबाव तयार झालेला असतो. पालकांना अपेक्षित असे यश मिळाले नाही तर त्याला नैराश्य येते.

त्यातूनच अनेकजण आत्महत्यासारखा मार्ग स्वीकारतात. गेल्या काही कालावधीमध्ये अशा प्रकारच्या आत्महत्यांचे प्रमाण वाढत चालल्यानेच सर्वोच्च न्यायालयाच्या या नव्या निर्देशांची गंभीर दखल केंद्र सरकारलाही घ्यावी लागणार आहे. जरी उम्मीद या प्रकल्पाच्या निमित्ताने केंद्र सरकार या विषयावर काम करत असले तरी हा प्रकल्प देशाच्या कानाकोपर्यात सर्व शिक्षण संस्थांपर्यंत पोहोचणेही तेवढेच महत्त्वाचे आहे. यश आणि अपयशाच्या नवीन व्याख्या सध्या रूढ होऊ पाहत आहेत आणि स्पर्धात्मक वातावरणाची तीव्रता वाढत आहे.

ते पाहता विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य जपण्यासाठी आगामी कालावधीमध्ये जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागणार आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशामुळे या विषयाला वेग मिळाला असला, तरी सरकारचा शिक्षण विभाग, विविध शिक्षण संस्था आणि पालक या सर्वांच्या सहकार्यानेच विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य जपण्याचे उद्दिष्ट पूर्ण होऊ शकेल हे विसरता येणार नाही. शैक्षणिक प्रक्रिया ही आव्हानात्मक न वाटता मैत्रीपूर्ण वाटायला हवी.

## शिक्षकांच्या वेतनातून दरमहा २५ टक्के जबरदस्तीने नियमबाह्य वसूली करणाऱ्या

# नांदेडच्या राणी लक्ष्मीबाई शिक्षण संस्थेची मान्यता रद्द करून शिक्षकांचे समायोजन करावे : संजयभाऊ कांबळे

लातूर : नांदेड येथील राणी लक्ष्मीबाई शिक्षण संस्था द्वारा संचालित शिवनिकेतन प्राथमिक शाळेतील शिक्षकांकडून दरमहा वेतनातून जबरदस्तीने २५ टक्के नियमबाह्य वसूली करणाऱ्या संस्थेची मान्यता रद्द करून संस्थेतील शिक्षकांचे समायोजन करण्यात यावे अशी मागणी भारतीय दलित पँथरचे प्रदेश कार्याध्यक्ष संजयभाऊ कांबळे यांनी मंगळवारी लातुरात पत्रकारांशी बोलताना केली. याबाबतचे निवेदन लातूरच्या शिक्षण उपसंचालकांनाही देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

शिवनिकेतन प्राथमिक शाळेत १९९५ पासून सहशिक्षिका म्हणून सेवारत असलेल्या श्रीमती वर्षा बाळूराव बनसोडे यांनी संस्था चालकांकडून मागच्या ३० वर्षांहून अधिक काळापासून होणाऱ्या दरमहा वेतनातील २५ टक्के रकमेच्या वसुलीला कंटाळून नाईलाजाने पोलिसांकडे धाव घेतली आहे. त्यांच्या तक्रारीवरून नांदेडच्या शिवाजी नगर पोलीस ठाण्यात फिर्यादही दाखल करण्यात आली आहे. श्रीमती बनसोडे यांच्या फिर्यादीवरून राणी लक्ष्मीबाई शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सचिन शंकरराव टाले , सचिव शिवकुमार शंकरराव टाले, उपाध्यक्षा विजयाराणी संजय सायाळकर , संस्थाचालक सिंधुताई शंकरराव टाले, मुख्याध्यापिका शिवमाला शेटकार, व्यंकट चोंडे या सहाजणांविरुद्ध नांदेडच्या शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. संस्थाचालक आणि पदाधिकारी नोकरीवरून कमी करण्याची धमकी देवून जबरदस्तीने संस्थेतील सर्व ३५ ते ४० शिक्षकांकडून दरमहा त्यांच्या वेतनातून २५ टक्के रक्कम व्यंकट चोंडे यांच्यामार्फत सक्तीने वसूल करत असत. या प्रकरणी नांदेड जिल्हा




परिषदेच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडेही रितसर तक्रार करण्यात आली होती. शिक्षणाधिकाऱ्यांनी या तक्रारीच्या अनुषंगाने गटशिक्षणाधिकारी व दोन शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांची त्रिसदस्यीय चौकशी समिती स्थापन केली होती. या चौकशी समितीच्या अहवालातही शाळा प्रशासन शिक्षकांना काम नसतानाही शाळेपुर्वी व शाळेनंतर २ ते ३ तास कोणतीही पूर्व सूचना न देता शाळेत बसवून ठेले जात असे. वर्षा बनसोडे यांच्या तक्रारीनुसार वेतनातून २५ टक्के रक्कम वसूल केली जात असल्याबाबतचे पुरावेही ऑडिओ रेकॉर्डिंगच्या स्वरूपात ऐकविण्यात आल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

यावेळी बोलताना संजयभाऊ कांबळे यांनी या प्रकरणातील तपास अधिकारी आरोपींना पाठीशी घालत असल्याचा आरोप केला. वर्षा बनसोडे यांनी पोलिसात संस्था चालकाविरुद्ध तक्रार दिल्यानंतर संस्थाचालकांकडून त्यांना नाहक त्रास दिला जात असल्याचे नमूद केले. या प्रकरणी शिक्षणाधिकाऱ्यांच्या चौकशी अहवालावरून सदरील शिक्षण संस्थेची ,मान्यता कायमस्वरुपी रद्द करून या संस्थेतील शिक्षकांचे समायोजन करण्यात यावे,अशी ,मागणी एका निवेदनाद्वारे शिक्षण उपसंचालकांकडे केली असल्याचे सांगितले. पिडीत सहशिक्षिका वर्षा बनसोडे यांनी यावेळी बोलताना १९९५ साली नोकरीला लागल्यापासून संस्था चालकांकडून आपण त्रास सहन केल्याचे सांगितले. संस्थाचालक सिंधुताई टाले यांनी आपला जाणीवपूर्वक अपमान करून जातीवरुन अपमानास्पद वागणूक दिल्याचा आरोपही यावेळी केला.


संस्था चालकांनी पैसे मागितल्याचे मोबाईलवर रेकॉर्ड केलेले संभाषणही त्यांनी या पत्रकार परिषदेत ऐकवले. संस्था चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आलेला असतानाही पोलीस त्यांच्यावर कार्यवाही करण्यास टाळाटाळ करत असल्याचा आरोपही वर्षा बनसोडे यांनी केला. यावेळी पिडीत सहशिक्षक संजय कल्याणकर व महेश फिसके यांनीही आपली कैफियत मांडून न्याय मिळवून देण्याची मागणी केली. यावेळी भारतीय दलित पँथरचे जिल्हाध्यक्ष धम्मानंद घोडके, संग्राम कदम, विश्वास कांबळे, ॲड. अजय बनसोडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.


## सुकळी येथील शेतकऱ्यांचे आमरण उपोषण पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे यांच्या मध्यस्थीने मागे



केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील सुकळी येथील शेतकऱ्यांचे आमरण उपोषण हे केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे यांच्या मध्यस्थीने मागे घेण्यात आले आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, केज तालुक्यातील सुकळी येथील अमर गायकवाड यांच्यासह तीन शेतकरी हे जमिनीचा मावेजा मिळवा यासह विविध मागण्या संदर्भात केज येथील सार्वजनिक बांधकाम उपविभागीय कार्यालयासमोर दिनांक २२ जुलै २०२५ रोजी पासून आठ दिवस आमरण उपोषणास बसले असता संबंधित व वरिष्ठ कार्यालयाकडून त्यांच्या उपोषणाची दखल घेण्यात आली नाही परंतु केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांनी सदर प्रकरणी उपोषणकर्त्या समवेत चर्चा करून संबंधित कार्यालयांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून चर्चेअंती मार्ग काढून तीन शेतकऱ्यांना मध्यस्थी करून उपोषण मागे घेतले आहे. केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे, सहाय्यक पोलीस निरीक्षक मांजरमे, ग्रेट पोलीस उपनिरीक्षक इनामदार, गोपनीय शाखेचे पोलीस अमलदार शिवाजी कागदे यांच्या मध्यस्तीने शेतकऱ्यांचे आमरण उपोषण स्थगित करण्यात आले आहे.

## सावधान! कबुतरांच्या विष्ठेमुळे उद्भवू शकतात आरोग्यासंबंधित 'हे' गंभीर आजार, दुर्लक्ष केल्यास गमवावा लागेल जीव





लहान मुलांपासून अगदी मोठ्यांपर्यंत सगळ्यांचं कबुतरांना दाणे टाकायला खूप जास्त आवडतात. कोणत्याही ठिकाणी गेल्यानंतर कबुतर खाना दिसल्यास सगळ्यात आधी तिथे असलेल्या कबुतरांना तांदूळ, गहू किंवा मक्याचे दाणे टाकले जातात. मक्या प्राण्यांना किंवा पक्षांना अननपदार्थ देणे म्हणजे पुण्य अशी अनेकांची समज आहे. बरीच लोक स्वतःच्या खिशातील पैसे देऊन किंवा घरातील दाणे, तांदूळ आणून कबुतरांना खायला देतात. पण कबुतरांच्या जवळ जाणे आरोग्यासाठी अतिशय घातक ठरू शकते. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला कबुतरांच्या जवळ गेल्यामुळे आरोग्याला कोणती हानी पोहचते? कबुतरांच्या विष्टेमुळे कोणते गंभीर आजार होतात? याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. चला तर जाणून घेऊया.

कबुतरांना दाणे टाकणे आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकते. तसेच आरोग्यासंबंधित अनेक जीवघेण्या समस्या उद्भवू शकतात. मात्र आपल्यातील अनेकांना ही गोष्ट माहित नाही. कबुतरांची विष्ठा मानवी आरोग्यासाठी घातक ठरते. मुंबईसारख्या मोठ्या शहरांमध्ये कबुतराने खाऊ घालणाऱ्या लोकांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. कबुतर खाना आणि आजूबाजूच्या पाळीव कबुतरांना मोठ्या प्रमाणावर दाणे खायला दिले जातात. कबुतरांना खायला मिळू लागल्यामुळे मुंबईसह इतर अनेक ठिकाणी कबुतरांची संख्या वाढली आहे. अर्बन इकोलॉजिस्ट कबुतरांना 'उडणारे उंदीर' असे म्हणतात. कारण कबुतर उंदरांप्रमाणे अधिक प्रजनन, आजार पसरवण्याची क्षमता आणि सार्वजनिक उधवस्त करून टाकतात.

कबुतरांच्या विष्ठेमुळे होणारे आरोग्यासंबंधित गंभीर आजार:

कबुतर घराच्या बाल्कनीमध्ये, खिडकीमध्ये किंवा घराच्या आजूबाजूला असलेल्या मोकळ्या ठिकाणी राहतात. पण त्याच्या विष्ठेमुळे आरोग्यासंबंधित अनेक गंभीर आजार पसरू लागतात. कबुतरांची विष्ठा आजूबाजूच्या परिसरात पसरल्यामुळे यूरिक ॲसिड आणि अमोनियाचे प्रमाण अधिक वाढू लागते. याशिवाय घातक बॅक्टेरिया आणि फंगस वाढून त्वचेसंबंधित समस्या उद्भवतात.

हिस्टोप्लास्मोसिस:

कबुतरांच्या विष्ठेमुळे हिस्टोप्लास्मोसिस आजार होण्याची शक्यता असते. कबुतरांची वाळलेली विष्ठा श्वासाद्वारे शरीरात गेल्यानंतर फुफ्फुसांमध्ये इन्फेक्शन वाढू लागते.

क्रिप्टोकॉकोसिस:

क्रिप्टोकॉकोसिस हे एक फंगल इन्फेक्शन आहे. क्रिप्टोकॉकोसिस झाल्यानंतर मेंदू आणि फुफ्फुस प्रभावित होऊन आरोग्याला हानी पोहचते. तसेच पंख आणि विष्ठेचे कण श्वसनलिकेमध्ये गेल्यानंतर ॲलर्जिक लंग डिजीज होऊन संपूर्ण आरोग्य बिघडून जाते. तसेच फुफ्फुस निकामी होऊन जातात. दीर्घकाळ कबुतरांच्या संपर्कात राहिल्यामुळे जुना खोकला, श्वासाची समस्या आणि फुफ्फुसांमध्ये सूज वाढण्याची जास्त शक्यता असते.

कबुतराच्या विष्ठेशी संबंधित आरोग्याला निर्माण होणारे धोके:

कबुतराच्या विष्ठेमध्ये बॅक्टेरिया, बुरशी आणि प्रथिने असू शकतात ज्यामुळे ॲलर्जीक प्रतिक्रिया आणि श्वसन संक्रमण होऊ शकते. वाळलेल्या विष्ठेतील धूळ श्वास घेतल्याने दमा आणि ॲलर्जी वाढू शकतात आणि अतिसंवेदनशील न्यूमोनिया होऊ शकतो.

## गटारी स्पेशल! घरी बनवा चवदार आणि मसालेदार रवा बोंबील फ्राय; खास दिवसाचा खास मेन्यू



लवकरच श्रावण सुरु होणार आहे अशात अनेकांचा गटारी प्लॅन आतापासूनच रंगू लागला आहे. गटारी स्पेशल प्रत्येकाच्या घरी नॉनव्हेजचा प्लॅन बनतो. कोणी बाहेरून जेवण ऑर्डर करतं तर कुणी घरीच चविष्ट मेजवानीचा प्लॅन करतं. अहो, चविष्ट पदार्थ जर घरीच तयार करता येत असेल तर त्यासाठी उगाच पैसे का घालवायचे? हाच विचार करत आता आजची रेसिपी वाचा आणि गटारीसाठी घरी जेवणाचा स्पेशल प्लॅन बनवा.

बोंबील, ज्याला इंग्रजीत इेलरू र्ऑलझ्र म्हणतात, हा एक कोवळा व रसाळ मासा आहे जो कोकण व मुंबईत विशेष लोकप्रिय आहे. याचे रवा फ्राय हे पारंपरिक व चविष्ट कोळीवाडा-शैलीतील डिश आहे. बाहेरून कुरकुरीत आणि आतून नरमसरसा असा बोंबील रवा फ्राय चवीलाही अफलातून लागतो आणि भात, भाकरी किंवा अगदी स्टार्टर म्हणूनही सर्व्ह करता येतो. चला जाणून घेऊया यासाठी लागणारे साहित्य आणि कृती.

साहित्य

लिंबाचा रस – १ चमचा
मीठ – चवीनुसार
हळद – ट चमचा
लाल तिखट – १ट चमचा
आलं-लसूण पेस्ट – १ चमचा
बारीक रवा – ट कप
तांदळाचे पीठ (ऐच्छिक) – २ चमचे
तेल – तळण्यासाठी

कृती

बोंबील रवा फ्राय बनवण्यासाठी सर्वप्रथम बोंबील स्वच्छ धुऊन घ्या व पाणी निथळू द्या. त्यानंतर त्यात मीठ, हळद आणि लिंबाचा रस घालून १० मिनिटे मॅरिनेट करा.

यांनंतर एका वाडग्यात लाल तिखट, आलं-लसूण पेस्ट घालून बोंबीलमध्ये चांगलं मिक्स करा आणि १०-१५ मिनिटे झाकून मॅरीनेट करून घ्या.

दुसऱ्या ताटात बारीक रवा आणि तांदळाचं पीठ मिक्स करून ठेवा.

प्रत्येक बोंबीलला या रवा-पीठाच्या मिश्रणात लावून दोन्ही बाजूंनी हलक्या हाताने थापून घ्या. रवा बोंबीलमध्ये छान कोट करा.

तवा गरम करा. त्यावर थोडं तेल टाका.

रवा लावलेले बोंबील तव्यावर ठेवा आणि मध्यम आचेवर दोन्ही बाजूंनी कुरकुरीत होईपर्यंत भाजून घ्या.

आता तुमचा चविष्ट रवा बोंबील फ्राय तयार आहे

बोंबील अतिशय नाजूक असतो, म्हणून तव्यावर उलटताना हलक्या हाताने सांभाळा.

अजून चवदार हवे असल्यास थोडं कोथिंबीर-हिरवी मिरची पेस्टही मॅरिनेशनमध्ये घालू शकता.

तयार रवा बोंबील फ्राय तुम्ही तांदळाच्या भाकरीसोबत अथवा चपातीसोबत खाण्यासाठी सर्व्ह करा.

# रोज सकाळी उठल्यानंतर एक लिटर पाणी प्यायले तर काय होईल? तज्ज्ञ काय सांगतात, वाचा




सकाळी उठल्यानंतर प्रथम काय करावे याबाबत अनेक मतभेद आहेत. सकाळी उठल्यानंतर काही लोक प्रथम चहा पितात, काही लोक चालायला जातात, कोणी फळ खातात तर कोणी नाश्ता करतात. पण, यापैकी सर्वात साधी आणि फायदेशीर गोष्ट म्हणजे सकाळी उठल्यानंतर पाणी पिणे ही आहे, तेही दात घासण्याआधी.

सकाळी उठल्यानंतर लगेच एक लिटर पाणी पिणे हे फायदेशीर असू शकते आणि आरोग्यासाठी चमत्कारी ठरू शकते, असे मत डॉ. मंजुषा अग्रवाल यांनी द इंडियन एक्स्प्रेसला माहिती देताना व्यक्त केले. त्या मुंबईतील परळ येथील ग्लेनिगल्स हॉस्पिटलमध्ये इंटरनल मेडिसनचे वरिष्ठ सल्लागार आहेत.

६-८ तासांची झोप घेतल्यानंतर शरीरातील पाण्याची पातळी कमी होते. सकाळी उठल्यानंतर लगेच पाणी प्यायल्याने शरीरातील अवयवांना जाग येते, म्हणजेच त्यांचे कार्य सुरू होते; ज्यामुळे शरीरातील विषारी घटक बाहेर टाकले जातात आणि दररोज चांगले कार्य करण्यासाठी शारीरिक प्रणालीला चालना मिळते. तसेच सर्वात महत्त्वाचा फायदा म्हणजे पचनक्रिया सुधारते, असे डॉ. अग्रवाल सांगतात.


तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार, पाणी तुमचे पोट आणि आतड्याचे कार्य सुरळीतपणे पार पडण्यासाठी मदत करते. तसेच त्यामुळे पोटफुगी किंवा बद्धकोष्टतेचा (पोट साफ न होण्याचा) त्रास टाळता येतो. जे लोक पाणी पिऊन आपला दिवस सुरू करतात, त्यांना त्यांच पचनक्रिया सुधारल्याचा अनुभव आला आहे. तसेच त्यांच्या त्वचेमध्येही खूप फरक झाल्याचे जाणवले आहे. त्वचा ताजी, मुलायम आणि त्वचेतील पाण्याची पातळी वाढल्याचे जाणवेल. पाणी शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकते, ज्यामुळे मुरुमे आणि कोरडेपणा कमी होण्यास मदत होते, ज्यामुळे तुमच्या त्वचेला चमक येते, असे डॉ. अग्रवाल यांनी स्पष्ट केले.

सकाळी लवकर पाणी पायल्याने तुमची ऊर्जा पातळीदेखील वाढते. जेव्हा तुमच्या शरीरातील पाण्याची पातळी राखण्यासाठी सकाळी लवकर पाणी पिता, तेव्हा तुमचा मेंदू चांगले काम करतो, तुम्हाला अधिक सतर्क झाल्यासारखे वाटते आणि तुमचा मूड सुधारतो. सकाळी पाणी प्यायल्याने कॅलरीचा उर्जे साठी वापर होण्यास आणि वजन नियंत्रणात मदत होऊ शकते, तसेच संतुलित आहार घेणे आणि दररोज व्यायाम करणे, असे डॉ. अग्रवाल म्हणाले.

म्हणून जर तुम्हाला ताजेतवाने, अधिक सक्रिय आणि तंदुरुस्त होण्यासाठी एक सोपा, नैसर्गिक मार्ग हवा असेल तर दररोज सकाळी एक लिटर पाणी पिण्याचा प्रयत्न करा. हृदय, यकृत आणि मूत्रपिंडाच्या समस्या असलेल्या लोकांनी इतक्या प्रमाणात पाणी घेण्याबाबत सावधगिरी बाळगली पाहिजे आणि त्यांच्या डॉक्टरांच्या सल्ल्याचे पालन करावे आणि त्यानुसार ते घ्यावे, असे डॉ. अग्रवाल यांनी स्पष्ट केले.

## जिवंत सापाची नाही तर नागदेवाच्या प्रतिमेची करावी पूजा:आज नागपंचमी, नागमणी आणि उडणाऱ्या सापांशी संबंधित मिथक आणि तथ्य

आज (२९ जुलै) श्रावण शुक्ल पंचमी तिथी म्हणजेच नाग पंचमी आहे. या सणाला शिवलिंगासोबत नागदेवाची पूजा केली जाते. नाग पंचमीला बरेच लोक जिवंत सापांची पूजा करतात, सापांना दूध पाजतात, परंतु हे योग्य नाही. दूध हे सापांसाठी विषासारखे आहे, दूध पिल्याने सापाचा मृत्यूही होऊ शकतो. नाग पंचमीला नागदेवाच्या मूर्तीची किंवा चित्राची पूजा करावी. या दिवशी विशेषतः शिवलिंगावर बसलेल्या नागदेवाच्या मूर्तीचा अभिषेक करावा.



उज्जैनच्या सर्प संशोधन संस्थेचे संचालक मुकेश इंगळे म्हणतात की, साप हा असा प्राणी आहे जो दूध पचवू शकत नाही. जर सापाला दूध पाजले तर त्याला न्यूमोनिया होतो, या आजाराने साप मरू शकतो. त्यामुळे सापाला दूध पाजू नये.

जगभरात सापांच्या ३ हजारांहून अधिक प्रजाती आढळून आल्या आहेत. भारतात ३२० हून अधिक प्रजातींच्या साप आहेत आणि मध्य प्रदेशात ४२ हून अधिक प्रजातींच्या साप आहेत. देशभरात अशा सुमारे ६० प्रजातींच्या साप आहेत, ज्यांच्या चाव्यामुळे माणसाचा मृत्यू होऊ शकतो.

मध्य प्रदेशात ४ प्रकारचे साप आहेत, ज्यांच्या चाव्यामुळे माणसाचा मृत्यू होऊ शकतो. या चार सापांना बिग फोर म्हणतात. कोब्रा, क्रेट, रसेल व्हायपर आणि स्केल्ड व्हायपर नावाच्या सापांना बिग फोर म्हणतात.

# मन्याड-गोदा खोर्याची १५ फुटी महाराखी पोलिस अधीक्षक अभिनाश कुमार यांचे हस्ते सीमेकडे रवाना

## लगुळ नगरीच्या पोलिस पाटील सौ.नागमणी देशमुख या उच्च शिक्षित भगीनीनी स्वत:च्या हस्तकलेतून २०० राख्या भेट दिल्या

बिलोली / प्रतिनिधी :- आमचा भारत देश कृषिप्रधान असल्यामुळे जागतिक स्तरावर हीच ओळख भारताचे मोठेपण सांगुन जाते.आणि माझ्या भारत मातेचे रक्षण माझा शूर सैनिक बांधव डोळ्यात तेल घालून सीमेवर तैनात असतो,त्यामुळेच भारताचे माजी प्रधानमंत्री लालबहादूर शास्त्रीजींची घोषणा होती जय जवान! जय किसान! देशाचा शूर वीर जवान आणि शेतकरी राजा यांचे कार्य अनमोल आहे म्हणून क्रांतिभुवन बहाद्दरपुरा,ता.कंधार या नगरीतील हरहुन्नरी कलावंत गोपाळसुत दत्तात्रय एमेकर गुरुजी यांनी सुंदर अक्षर कार्यशाळा कंधार व राष्ट्रभक्त मित्र परिवाराच्या वतीने १२ वर्षापूर्वी सुरु केलेला मन्याड-गोदावरी खोऱ्यातील रक्षाबंधन सणानिमित्त भारतीय सीमावर्ती भागात आपल्या परिवारापासून कोसोदूर राहून भारत मातेच्या सीमेचे रक्षण करणाऱ्या शूर सैनिक बांधवांना मन्याड-गोदावरी खोऱ्यातील शालेय भगीनींच्या ३३३३ सदिच्छा व ३३३३ राख्या सोबत १५ फुटी महाराखी हा देशभक्तीच्या स्फूर्तिदायक उपक्रमाची सुरुवात बिलोली येथे साने गुरुजी प्राथमिक शाळा व आंतर भारती विद्यालय बिलोली येथे मुख्याध्यापक मा.विठ्ठलराव चंदनकर सर यांच्या सहकार्याने दि.०७ जुलै २०२५ रोजी सदिच्छापत्राच्या विमोचनाने आरंभ झाला. आंतरभारती शिक्षण संस्थेने पुढाकार घेतला होता, तरीही या उपक्रमात बिलोली तालुक्यातील महाळप्पा पटणे विद्यालय, आदमपूर, संगमेश्वर विद्यालय, बडूर, के. रामलू पब्लिक स्कूल,



कुंडलवाडी, विजय पटणे मेमोरियल स्कूल, बिलोली, आंतरभारती माध्यमिक विद्यालय, बिलोली, पूज्य साने गुरुजी प्राथमिक विद्यालय, बिलोली, जयराम आंबेकर विद्यालय, अर्जापूर आदी शाळांतील शेकडो विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवून शुभेच्छापत्र व राख्या बनविल्या आहेत.लघूळ नगरीच्या पोलिस पाटील नागमणी देशमुख या उच्च शिक्षित भगीनीनी स्वत:च्या हस्तकलेतून २०० राख्या तयार करून पाठवल्या हे खास वैशिष्ट्ये आहे.नांदेड नगरीतील गुजराती हायस्कूल, शाकुंतल एक्सलन्स नांदेड, होलिसिटी इंग्लिश स्कूल, सावित्रीबाई फूले विद्यालय, कुसुमताई विद्यालय सिडको, होळी विद्यालय,सह्याद्री इंग्लिश स्कूल लोहा,म.फुले प्राथमिक शाळा कंधार, गणपतराव मोरे विद्यालय कंधार, श्री बसवेश्वर विद्यालय फुलवळ,जनता हायस्कूल दगडसांगवी, आश्रम शाळा नेहरु नगर, म.फूले हायस्कूल शेकापूर, श्री शिवाजी विद्यालय बारुळ, श्री शिवाजी हायस्कूल हु.माणिकराव काळेरोड कंधार येथील समिक्षा कोल्हे वर्ग ९ वा अ सेमी या चिमुकलीने १० फुटी आकर्षित राखी तयार केली. मानव्य विकास विद्यालय देगलूर,जि.प.प्राथमिक शाळा येरगी ता.देगलूर, तर किनवट तालुक्यातील जि.प.प्राथमिक शाळा पिंपळगाव (सी)आदिवासी भागातील विद्यार्थ्यांनी बांबू अन् मोर पंखापासून मोठ्या दोन राख्या तयार करुन पाठविले.यात मनोहर पेठकर सर यांनी परीश्रम घेतले. शिवानंद स्वामी, साईनाथ एमेकर, सरपंच पाटील येरगी,अर्शदखान सर,सीमा देशपांडे, धनगे मॅडम, शिल्पा एमेकर,मुख्याध्यापक दिगंबर वाघमारे,मुख्याध्यापक बापूराव मंगनाळे, पर्यवेक्षक अमित लोंड,कलाध्यापक अडकूते,राठोड सर यांनी उपक्रम साह्य केले.१५ फुटी महाराखी,राख्या व सदिच्छापत्र पोलिस अधिक्षक कार्यालय नांदेड येथून भारतीय सीमेवरील सैनिकांना दि.२८ जुलै २०२५ रोजी भारतीय डाक विभागामार्फत ए.पी.ओ २६२ रेजिमेंटचे कमांडिंग ऑफिसर मा.राजेश कुमारजी व सुभेदार हवालदार शिवहारजी कागणे भोजुचीवाडीकर यांच्या बटालियनकडे रवाना होणार.या देशभक्तीच्या स्फूर्तिदायक कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ. गंगाधर तोगरे सर यांनी केले.पोलिस अधिक्षक अविनाश कुमारजी यांचे करकमलाहस्ते महाराखीचे व सदिच्छापत्र व राख्या भारतीय सैनिकांना सीमेवर विविध बटालियनला रवाना करण्यात आल्या. पोलिस अधिक्षक मा.अबिनाश कुमार यांचा सत्कार नित्याने एक वृक्ष रोपण करणारे वृक्षमित्र शिवसांब घोडके यांच्या हस्ते एक पुष्प वृक्ष व वनस्पतीचा माहितीग्रंथ देवून केले.ब्ररम्हकुमारी ज्योती बहेनजी यांनी एस.पी.ना राखी बांधून रक्षाबंधन उपक्रमाचे औचित्य साधले. कार्यक्रमास शासकीय गुत्तेदार आसाम सीमेवरचे भारतीय वीर सैनिक शिवकांत दिनकर वैजनाथ संभाजीराव सादलापूरे,आदर्श मुख्याध्यापक, माझे कौतुकश्री मा.गंगारामजी रुमाले, मेजर दुलबाजी जायभाये,आदर्श शिक्षक मा.शशिकांतजी पा.कदम,अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाचे मा.चंद्रकांतजी दामेकर ,कविराज व सुलेखनकार मा.अशोकरावजी कुरुडे,बंधुराज मा. साईनाथ एमेकर व मा. रामकिशन इंदूरकर,अभियंता मा.पांडुरंगजी गज्जेवार, साहित्यिक मा.नारायणरावजी पारेकर डिघोळकर, मा.मोहनरावजी कुरुडे,सुवर्ण व्यवसायिक मा.उमेशरावजी गरुडकर ,अभियंता मा.घनशामजी रुमाले,मा.माधवरावजी सादलापूरे साहेब,प्रहारचे विश्वंभर पांचाळ आदी उपस्थित होते.

# धनंजय पवार यांना उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा राज्यस्तरीय डॉ.एस.आर.रंगनाथन् उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता पुरस्कार जाहीर

लातूर :- महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा राज्यस्तरीय डॉ.एस.आर.रंगनाथन् उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता(ग्रंथमित्र)पुरस्कार (रोख ५० हजार रुपये,सन्मानचिन्ह,प्रमाणपत्र व ग्रंथभेट) हसाळा,ता. औसा जि.लातूर येथील श्री.गुणवंतराव रामचंद्र पाटील सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष धनंजय वसंतराव पवार यांना जाहीर झाला असून,याबाबतची घोषणा राज्याचे कक्ष अधिकारी अ.ता.कुंडले यांनी दि.२८ जुलै २०२५ रोजी जाहीर केला आहे.धनंजय पवार यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

महाराष्ट्रातील जनतेचे सामाजिक,शैक्षणिक व सांस्कृतिक जीवन समृध्द करण्यासाठी व वाचन संस्कृती वृध्दिंगत होण्यासाठी राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयाचे योगदान लाभावे,यासाठी ग्रंथालयाचा गुणात्मक विकास व्हावा,ग्रंथालयांकडून राज्यातील जनतेला अधिक चांगल्या सेवा देण्यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने शासनाकडून दरवर्षी उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथालय पुरस्कार आणि ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्ते व सेवकांना डॉ.एस.आर.रंगनाथन् उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक (ग्रंथमित्र)पुरस्कार देवून सन्मानीत करण्यात येते.त्यातील सन २०२३-२०२४ या वर्षाचा सबंध राज्यातून एकमेव राज्यस्तरीय डॉ.एस.आर.रंगनाथन् उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता (ग्रंथमित्र) पुरस्कार हसाळा,ता.औसा जि.लातूर येथील श्री.गुणवंतराव रामचंद्र पाटील सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष धनंजय पवार यांना जाहीर झाला आहे,सदर पुरस्कार वितरणाचा सोहळा लवकरच राज्याच्या ग्रंथालय संचालनालयाकडून आयोजिला जाणार आहे.

लातूरचे धनंजय पवार यांना सदरील प्रतिष्ठेचा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे अध्यक्ष ग्रंथमित्र प्रभाकर कापसे,कार्यवाह ग्रंथमित्र राम मेकले,कार्याध्यक्ष डॉ.ब्रिजमोहन झंवर,उपाध्यक्ष ग्रंथमित्र युवराज जाधव,सहकार्यवाह काशिनाथ बोडके,कोषाध्यक्ष राम मोतीपवळे, संचालक हावगीराव बेरकीळे, संचलाक सूर्यकांत शिरसे, किरण बाबळसूरे, अशोक



खोडवे, श्रीधर स्वामी, जहांगीर सयय्द,नंदकुमार घोगरे,अनिल पाटील, गुप्तलिंग स्वामी, संतोष करमले,काशिनाथ साहू, बाळकृष्ण होळीकर, तुकाराम सुगावकर,बालाजी सूर्यवंशी, गोकर्णा सूर्यवंशी, राजकुमार सोनी, नागनाथ बिरादार,अमित म्हेत्रे,रामचंद्र तिरुके तसेच प्रा.पोपट भांबरे, उध्दव कदम, किरण कदम, अशोक भोंडे, वसंत भोजे, योगेश नाईकवाडे, वामनराव सूर्यवंशी इत्यादिंनी अभिनंदन केले आहे.

# लातूर जिल्ह्यात रासायनिक खतांची विक्री ई-पॉस प्रणालीद्वारे करणे बंधनकारक

लातूर :- जिल्ह्यातील सर्व किरकोळ रासायनिक खत विक्रेत्यांना अनुदानित रासायनिक खतांची विक्री ई-पॉस प्रणालीद्वारे करणे बंधनकारक आहे, असे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शिवसांब लाडके यांनी कळविले आहे. खत विक्रीच्या नोंदी तात्काळ आणि अचूकपणे आयएफएमएस प्रणालीमध्ये नोंदविणे आवश्यक आहे. ई-पॉस प्रणालीवरील खत साठा आणि प्रत्यक्ष गोडाऊनमधील साठा यामध्ये कोणतीही तफावत आढळू नये. यासाठी विक्रीची नोंद रियल टाइममध्ये घेणे बंधनकारक असून, याबाबत क्षेत्रीय खत निरीक्षकांमार्फत नियमित तपासणी केली जाणार आहे. साठ्यात तफावत आढळल्यास संबंधित अहवाल तात्काळ लातूर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय येथे पाठवावेत. तसेच, ज्या विक्रेत्यांनी अद्याप नवीन एल-१ सिक्युरिटी ई-पॉस मशिन प्राप्त केले नाही, त्यांनी १० ऑगस्ट २०२५ पूर्वी कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांच्याशी संपर्क साधून मशिन प्राप्त करावे आणि कार्यान्वित करावे, असे आवाहन लाडके यांनी केले आहे.

# उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा डॉ.एस.आर.रंगनाथन् उत्कृष्ट ग्रंथालय सेवक विभागीय पुरस्कार ग्रंथपाल सूर्यकांत जाधव याना जाहीर

लातूर :- महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा छत्रपती संभाजी नगर विभागीय डॉ.एस.आर.रंगनाथन् उत्कृष्ट ग्रंथालय सेवक (ग्रंथमित्र)पुरस्कार (रोख २५ हजार रुपये,सन्मानचिन्ह,प्रमाणपत्र व ग्रंथभेट) आलमला,ता. औसा जि.लातूर येथील विवेकानंद वाचनालयाचे ग्रंथपाल सूर्यकांत कमलाकर जाधव यांना जाहीर झाला असून,याची घोषणा राज्याचे या विभागाचे कक्ष अधिकारी अ.ता.कुंडले यांनी दि.२८ जुलै २०२५ रोजी जाहीर केला आहे.सूर्यकांत जाधव यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

महाराष्ट्रातील जनतेचे सामाजिक,शैक्षणिक व सांस्कृतिक जीवन समृध्द करण्यासाठी व वाचन संस्कृती वृध्दिंगत होण्यासाठी राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयाचे योगदान लाभावे,यासाठी ग्रंथालयाचा गुणात्मक विकास व्हावा,ग्रंथालयांकडून राज्यातील जनतेला अधिक चांगल्या सेवा देण्यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने शासनाकडून दरवर्षी उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथालय पुरस्कार आणि ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्ते व सेवकांना डॉ. एस.आर.रंगनाथन् उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक (ग्रंथमित्र)पुरस्कार देवून सन्मानीत करण्यात येते.त्यातील सन २०२३-२०२४ या वर्षाचा छत्रपती संभाजी नगर विभाग स्तरीय डॉ.एस.आर.रंगनाथन् उत्कृष्ट ग्रंथालय सेवक (ग्रंथमित्र) पुरस्कारआलमला,ता.औसा जि.लातूर येथील विवेकानंद वाचनालयाचे ग्रंथपाल सूर्यकांत कमलाकर जाधव यांना जाहीर झाला आहे,सदर पुरस्कार वितरणाचा सोहळा लवकरच राज्याच्या ग्रंथालय संचालनालयाकडून आयोजिला जाणार आहे.



लातूरचे सूर्यकांत जाधव यांना सदरील प्रतिष्ठेचा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे अध्यक्ष ग्रंथमित्र प्रभाकर कापसे,कार्यवाह ग्रंथमित्र राम मेकले,कार्याध्यक्ष डॉ.ब्रिजमोहन झंवर,उपाध्यक्षग्रंथमित्र युवराज जाधव,सहकार्यवाह ग्रंथमित्र काशिनाथ बोडके,कोषाध्यक्ष राम मोतीपवळे,संचालक ग्रंथमित्र हावगीराव बेरकीळे,ग्रंथमित्र सूर्यकांत शिरसे, किरण बाबळसूरे, अशोक खोडवे, श्रीधर स्वामी, जहांगीर सयय्द,नंदकुमार घोगरे,अनिल पाटील,गुप्तलिंग स्वामी, ग्रंथमित्र संतोष करमले,काशिनाथ साहू, बाळकृष्ण होळीकर,तुकाराम सुगावकर,बालाजी सूर्यवंशी, गोकर्णा सूर्यवंशी, राजकुमार सोनी, नागनाथ बिरादार,अमित म्हेत्रे,रामचंद्र तिरुके तसेच विवेकानंद वाचनालयाचे अध्यक्ष भागवत पाटील,उपाध्यक्ष विश्वनाथ बिराजदार,कोषाध्यक्ष सिध्दलिंग निलंगेकर,सदस्य शिवचरण धाराशिवे,कंकरसिंग हजारे,राजेंद्र पावले,महंमद शरीफ खाजा,युवराज पाटील इत्यादिंनी अभिनंदन केले आहे.

# साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंतीदिनी लातुरात शुक्रवारी भव्य प्रबोधन रॅली

लातूर : लातूर येथील 'जी -२४ 'या सामाजिक संघटनेअंतर्गत स्थापन झालेल्या साहित्यारत्न आण्णाभाऊ साठे जयंती दिनी शुक्रवारी १ ऑगस्ट रोजी सकाळी साडे आठ वाजता लातूर शहरात भव्य प्रबोधन रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. या रॅलीमध्ये लातूरमधील सर्व पुरोगामी संस्था, संघटना व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती समितीचे अध्यक्ष राजकुमार होळीकर आणि सचिव पांडुरंग देडे यांनी केले आहे.या शिवाय साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त लातूर शहर व सर्व तालुकास्तरावर जिल्ह्यामध्ये ऑगस्ट महिन्यात महिनाभर प्रबोधनाचे कार्यक्रम होणार असून 'जनसुरक्षा कायदा हटाव' संविधान बचाव', या विषयावर व्याख्याने आयोजित केलेली आहेत. त्यासाठी महाराष्ट्रातील नामवंत विचारवंत वक्त्यांना निमंत्रित करण्यात आलेले आहे. या सर्व कार्यक्रमाचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जयंती समितीचे अध्यक्ष राजकुमार होळीकर, सचिव पांडुरंग देडे, कार्याध्यक्ष अफजल कुरेशी, कोषाध्यक्ष ॲड. सोमेश्वर वाघमारे, सह कोषध्यक्ष मोहन कांबळे, सह सचिव गणेश गोमारे, उपाध्यक्ष शिरीष दिवेकर, बालाजी साबळे, बरकत काझी, डॉ. बी. आर. पाटील, महिला प्रतिनिधी महानंदा शेवाळे, सुधाताई कांबळे, निमंत्रक रामराजे आत्राम, यू.डी. गायकवाड आणि सल्लागार प्राचार्य सोमनाथ रोडे, प्रा. नागोराव कुंभार, प्रा. हर्षवर्धन कोल्हापुरे, प्रा. सुभाष भिंगे, प्रा. अशोक नारनवरे, प्रा. निशिकांत बारभुवन, नरसिंग घोडके, प्रा. सुधीर अनवले, कॉ. विश्वभर भोसले, तसेच गणपत तेलंगे, शिवाजी गायकवाड, प्रा. वैभव सरवदे, शिवाजी नरहरे, राजकुमार नामवाड आदींनी केले आहे.

# इलेव्हन स्टार स्पोर्ट्स क्लब तळवली यांच्या विद्यमाने शेती मार्गदर्शन व शेती लागवड शिबीर मोठ्या उत्साहात संपन्न

गुहागर :- सध्याच्या काळात अनेक शेतकरी अधिक नफ्यासाठी मोठ्या प्रमाणात रासायनिक खतांचा व कीटकनाशकांचा वापर करतात याने तात्पुरता फायदा होत असला तरी दुरगामी दुष्परिणाम होतात रासायनिक खते व कीटकनाशकांमुळे जमिनीतील चांगल्या सूक्ष्मजीवांची हानी होऊन जमिनीची सुपीकता कमी होते, रासायनिक खतांमधील रसायने मातीमध्ये साचून माती दूषित होऊन तिचा पोत व कस कमी होतो, रासायनिक खतांमुळे जमिनीची पाणी धरून ठेवण्याची क्षमता कमी होऊन भूजल जलसंवर्धन प्रक्रिया बंद होऊन जमिनीतील पाण्याचे साठे कमी होतात पर्यायी संपूर्ण निसर्गचक्राचा तोल ढासाळून शेतीस पूरक वातावरण व जमिनीचा कस न राहिल्याने पिकांचे उत्पादन घटते त्यामुळे खर्च जास्त व उत्पादन कमी झाल्याने कर्जाच्या बोझाखाली दबला गेलेला शेतकरी चुकीच्या मार्गावर जातो म्हणून शेतीमध्ये नवीन अस जल, जमीन, निसर्गाला पूरक अश्या शेत उत्पन्न वाढवणाऱ्या शेती लागवड पद्धतीचा वापर केला पाहिजे हा एक उद्देश मनाशी धरून इलेव्हन स्टार स्पोर्ट्स क्लब तळवली यांच्या विद्यमाने शेती मार्गदर्शन व शेती लागवड शिबीर राजेंद्र यशवंत पवार यांच्या अध्यक्षतेखाली रविवार दि. १३ जुलै २०२५ रोजी सकाळी ठीक १०:३० वाजता मराठी शाळा नं. ०१, तळवली, ता. गुहागर, जिल्हा रत्नागिरी येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाले. सदर प्रसंगी मार्गदर्शक म्हणून कृषी विद्यापीठ दापोलीचे डॉ. विजय आवारे, गुहागर तालुका कृषी अधिकारी अमोल क्षीरसागर, तालुका सहाय्यक कृषी अधिकारी डी. के., तालुका सहाय्यक कृषी अधिकारी अमित शेळके, शालेय शिक्षक डॉ. मनोज पाटील हे मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली होती त्यासर्वांचे कार्यक्रमाचे व स्पोर्ट्स क्लबचे अध्यक्ष राजेश यशवंत पवार यांनी शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले, स्पोर्ट्स क्लबचे सचिव मंदार दामोदर पवार यांनी सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर करताना सदर शिबिराची ध्येय, उद्दिष्टे व उद्देश समजावून सांगितले तसेच त्यांनी आपल्या धीरगंभीर व पहाडी आवाजात कार्यक्रमाच्या सूत्रसंचालनाची धुरा यशस्वीपणे सांभाळली. सदर प्रसंगी उपस्थित मार्गदर्शकांनी सेंद्रिय शेती काळाची गरज असून नैसर्गिक घटकांचा वापर करून मातीची गुणवत्ता सुधारता येते व पर्यावरणाची काळजी घेते आणि विषमुक्त अन्न उत्पादन पिकवता येते ज्यामुळे ती एक



आवश्यक आणि शाश्वत शेती पद्धत असून त्याचा वापर ही काळाची गरज आहे असे स्पष्ट मत नमूद केले व त्याचे प्रात्यक्षिक दाखवून त्याचे महत्व पटवून दिले. सरतेशेवटी सदर शिबीर यशस्वीपणे पार पाडण्यासाठी अथक परिश्रम घेणाऱ्या स्पोर्ट्स क्लबचे उपाध्यक्ष शांताराम अंबाजी पवार, सहसचिव प्रशांत भागूराम पवार, खनिजदार उज्वल जनार्दन पवार, उप. खजिनदार संतोष राजाराम पवार, हिशेब तपासणीस मनीष मुकुंद पवार, सदस्य नित्यानंद यशवंत जाधव, दिनेश यशवंत पवार, राकेश हरिश्चंद्र पवार, सुशांत श्रीपत पवार, विनोद भिकाजी पवार, आदित्य किसन पवार, उदय अर्जुन पवार, अमर अनंत कांबळे यांचे तसेच मार्गदर्शक पाहुण्यांचे, उपस्थित ग्रामस्थ, शेतकरी बांधव यांचे आभार मानून सचिव मंदार दामोदर पवार यांनी कार्यक्रमाची सांगता केली.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE